MHBU100018592022

फौ. कि. अर्ज नंबर २६९/२०२२
प्रकाश भिलाला -वि- सरकार

## निशाणी क्रमांक १ वरील आदेश.

अर्जदार प्रकाश रामलाल भिलाला, राहणार जामठी मालवीर, नेपानगर, जि. बु-हाणपूर यांनी सदरचा अर्ज फौजदारी प्रक्रिया सहिंता कलम ४५७ नुसार मुद्देमाल हिरो मोटार कॉप कंपनीची स्पेलंडर मोटार सायकल जिचा रजि.क्र. एम.पी-६८-एमएच.८८२५ चेचीस क्र.MBLHAW177M9G50190 आणि इंजिन क्र. JA07ABM9G01402 चा तात्पुरता ताबा मिळण्याकरता केला आहे.

२. अर्जदारचे असे कथन आहे की सदर मुद्देमाल हा मलकापूर शहर पोलीसांनी गुन्हा क्रमांक ३७०/२०२२ भादविचे कलम ३९२ सह कलम ३४ मध्ये जप्त केला आहे. अर्जदारनी असे कथन केले आहे की, केसचा अंतिम निर्णय लागण्यास बराच कालावधी जाणार आहे. दरम्यान सदरचे वाहन पोलीस ठाण्यात पडुन राहिल्यास ते तिच्या मध्ये बिघाड होण्याची तसेच सदर मोटारसायकल चे इंजन, टायर टयुब खराब होण्याची दाट शक्यता आहे व अर्जदार यांचे आर्थीक नुकसान होणार आहे. अर्जदार हे मे कोर्ट आदेश करतील त्या त्या वेळी सदर वाहन हजर करण्यास तयार आहेत व सर्व अटींचे पालन करण्यास तयार आहेत. म्हणुन त्यांनी विनंती केली की सदरील वाहन त्यास मिळावे.

३. सदर अर्जावर सरकारी वकील व तपासी अंमलदार यांचे म्हणणे मागविले.

४. सरकारी वकिलांनी सदर मोटारसायकल परत करण्यास त्यांची हरकत नोंदवून जप्त वाहनावर फायनान्स आहे किंवा कसे याबाबत स्पष्टता नसल्याचे नमुद केले आहे. तसेच अर्जदार हे बाहेरील राज्यातील असल्याने वाहन कोर्टासमोर आणण्यास अडचण येण्याची शक्यता वर्तवली आहे. तपासी अंमलदार यांनी हरकत नोंदवतांना वाहनाचे कागदपत्रे सादर

नसल्याचा आक्षेप घेतला आहे. तसेच वाहन खटला सुरु असतांना हजर ठेवतील याबाबत साशंकता व्यक्त केली आहे. तसेच विनानंबर प्लेट बाबत खुलाशामध्ये चेसीस क्रमांक नमुद करुन जप्त केलेली मोटारसायकल ही विनानंबर प्लेटचे असल्याचे नमुद केले आहे.

५. प्रथमतः जप्त केलेल्या वाहनाचा ताबा मिळण्यास अर्जदार पात्र आहेत काय हे पाहणे गरजेचे आहे. सदर प्रकरणामध्ये त्या वाहनाचे रजिष्ट्रेशन सर्टिफिकेट, अर्जदाराचे आधार कार्ड इ. कागदपत्रे दाखल केलेली आहे. त्याचे अवलोकन केले असता अर्जदाराच्या नावे एम.पी-६८-एमएच.८८२५ चेचीस क्र.MBLHAW177M9G50190 आणि इंजिन क्र. JA07ABM9G01402 हे वाहन नोंदणीकृत असलयाचे नोंदणी प्रमाणपत्रावरुन दिसुन येते. तसेच त्या अनुषंगाने विमाप्रमाणपत्रही सादर केले आहे. तपासी अधिकारी याने नि.क्र.११ वरील खुलाशामध्ये चेसीस क्रमांक नमुद केलेला आहे. सकृतदर्शनी नोंदणी प्रमाणपत्रावरील चेसीस क्रमांक व नि.क्र.११ वरील चेसीस क्रमांक यात साम्यता दिसुन येते. त्यामुळे ते वाहन अर्जदाराच्या नावे नोंदणीकृत असल्याचे सकृतदर्शनी दिसुन येते. केवळ अर्जदार ह परराज्यातील आहे म्हणून वाहन परत न करणे हे न्यायोचित होणार नाही.

६. अशा परिस्थितीमध्ये जप्त वाहन हे पुराव्याचे कामी आवश्यक असल्यास ते परत करते समयी काही अटी व शर्ती घालणे योग्य, न्यायाचे दृष्टीने उचित ठरते. अद्याप केसचा गुणदोषावर निकाल होण्यास बराच कालावधी जाणार आहे. त्यामुळे मोटार सायकलसारखे वाहन पोलीस ठाण्यात पडुन राहिले तर त्याचे तत्सम पार्ट खराब होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. शिवाय जप्त वाहनाबाबत कोणीही आपला दावा अगर प्रतिदावा केलेला नाही. अशा परिस्थितीमध्ये अर्जदारास खालील अटी व शर्तीवर मोटार सायकल परत देणे न्यायाचे होईल. म्हणून मी खालील आदेश पारीत करत आहे.

## आदेश

१ अर्ज मंजूर करण्यात येतो.

२ अर्जदारने सदरील वाहन म्हणजेच हिरो मोटार कॉप कंपनीची स्पेलंडर मोटार सायकल जिचा रजि.क्र.एम.पी-६८-एमएच.८८२५ चेचीस क्र. MBLHAW177M9G50190 आणि इंजिन क्र. JA07ABM9G01402 चा कोणत्याही प्रकारे हस्तांतरित करु नये व

बेकायदेशिर हेतुसाठी ते वापरु नये.

३ अर्जदाराने सदरील वाहनामध्ये कोणताही फेरबदल करु नये.

४ अर्जदाराने सदरील वाहन न्यायालय सांगेल त्या त्या वेळेस पुराव्याकामी न्यायालयात, पोलीस ठाण्यात हजर करावे.

५ अर्जदारने रक्कम रुपये ५०,०००/- (रुपये पन्नास हजार) चे बंधपत्र या न्यायालयात द्यावे.

६. वाहनाचा ताबा देतांना मुळ नोंदणी प्रमाणपत्राची, चेसीस क्रमांकाची व इंजिन क्रमांकाची खात्री करुन नंबरप्लेट बाबत पूर्तता अर्जदाराकडुन करुन घ्यावी.

७. येणेप्रमाणे अर्ज निकाली करण्यात आला.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by SHRINIVAS ARUN KULKARNI
Date: 2022.11.05 17:34:51 +0530

दिनांक ०५/११/२०२२

( श्रीनिवास अ.कुलकर्णी )
न्यायदंडाधिकारी प्र.वर्ग कोर्ट क्र.१, मलकापूर